INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# स्थानिक इतिहासाचे महत्त्व
# (Importance of Local History)

**डॉ. कांतराव किसनराव कलाणे**
इतिहास विभाग प्रमुख,
प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय,
नेकनूर ता.जि. बीड.
E-mail: kalanekantrao@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/01.2026-75282966/IRJHIS2511026/November 2025**

**प्रस्तावना :**

स्थानिक इतिहास हा प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासाच्या प्रावासातील मैलाचा दगड असतो. स्थानिक इतिहास वगळून प्रादेशिक आणि राष्ट्रीय इतिहासाला पूर्णत्व येत नाही. प्रसिध्द इतिहासकार रेनियरच्या मते, 'स्थानिक इतिहास हा अशा पध्दतीने लिहिला पाहिजे की, तो देशाच्या इतिहासामध्ये चपखल बसला पाहिजे'. शेवटी स्थानिक इतिहास हा प्रादेशिक वा राष्ट्रीय इतिहासाचाच एक भाग आसतो. स्थानिक इतिहासाचे एखादे पान जागतिक इतिहासात आपले महत्वपूर्ण स्थान निर्माण करू शकते स्थानिक इतिहासाच्या सहाय्याने सर्वांगिण राष्ट्रीय इतिहास लिहिला जाऊ शकतो. या दृष्टीने स्थानिक इतिहासाकडे पहावे.

शाळा-कॉलेजमधून विद्यार्थ्यांना जगाचा, राष्ट्राचा इतिहास शिकवला जातो, पण नेमका त्यांच्या जिल्हयाचा, तालुक्याचा, त्यांच्या परिसराचा, गावचा इतिहास त्यांना शिकवला जात नाही. शिक्षणाच्या बाबतीतील या उणिवेचे सर्वात महत्वाचे कारण असे की, असा इतिहास शिकवायचा म्हटले तर तो उपलब्ध होत नाही. महाराष्ट्रापुरताच विचार केला तर संपूर्ण महाराष्ट्रभर अनेक गडकोट, प्राचीन मंदिरे, प्राचीन मठ, लेणी, वाडे, शिलालेख इ. चे अस्तित्व ठायीठायी दिसुन येते. पण त्यांचा लिखित इतिहास कुठे आणि किती आहे? तेव्हा असा इतिहास शोधला पाहिजे, लिहिला पाहिजे आणि तो आजच्या पिढीसमोर मांडला पाहिजे, त्याच्या शिवाय राष्ट्रीय इतिहासाला परिपूर्णता येणार नाही. हाच धागा पकडून प्रस्तुत शोधनिबंधातून स्थानिक इतिहासाचे महत्व विषद करण्याचाप्रयत्न केला आहे.

**गृहितके :**

1. स्थानिक इतिहासाच्या पायावरच राष्ट्रीय इतिहासाची इमारत उभी असते.
2. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक आणि राष्ट्रीय इतिहासाच्या प्रवासातील मैलाचा दगड होय.

**स्थानिक इतिहासाचा हेतु / उदिष्टये :**

3. स्थानिक इतिहासाच्या पायावरच राष्ट्रीय इतिहासाची इमारत उभी असते म्हणून स्थानिक इतिहासाचा अभ्यास आवश्यक आहे

4. गावच्या, परिसराचा इतिहास, संस्कृती, रूढी, परंपरा, चालिरीती, वारसा समजण्यास मदत होते.
5. इतिहासात होऊन गेलेल्या लढाया, तह-करार इतिहासकालिन राजधान्या गडकोट किंवा लेणी समूह इ. बाबींच्या अस्तित्वामुळे काही ठिकाणांना इतिहासात महत्वाचे स्थान प्राप्त होते, असा स्थानिक इतिहास अभ्यासणे.
6. स्थानिक इतिहासाचे धागे प्रादेशिक इतिहास अधिक समृध्द बनवू शकतात म्हणून स्थानिक इतिहास अभ्यासणे

**स्थानिक इतिहासातील घटक** :

आज केवळ राजकीय इतिहास हाच इतिहासाच्या अभ्यासाचा विषय राहिलेला नाही. तर त्याबरोबर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक इतिहास हा देखील इतिहासाच्या अभ्यासात महत्वपूर्ण आहे स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून यावर प्रकाश टाकता येतो. स्थानिक इतिहासात अनेक महत्वाचे घटक येतात. उदा. नद्या, पर्व, पर्यावरण, जमिन, पाऊस, खनिज उत्पादने, मठ, मंदिरे, मुर्ती, विहार, चैत्यगृहे, चर्च, नाणी, शिलालेख, गढी, वाढे, जलाशय, साहित्य निर्मिती, वृत्तपत्रांचा विकास इ. असंख्य घटक स्थानिक इतिहासात मोडतात. त्याचा अभ्यास करून आपणास खऱ्या अर्थाने आपला, परिसराचा इतिहास समाजासमोर मांडता येतो. त्यासाठी गरज आहे ती संशोधक वृत्तीची, चिकित्सक पणे त्याकडे पाहण्याची. वरिल प्रकारचे स्थानिक इतिहासाचे धागे प्रादेशिक इतिहास अधिक समृध्द बनविण्यासाठी मदत करतात.

**स्थानिक इतिहासाचे महत्व** :

इंग्लंड, अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्ये प्रत्येक परगण्यांचाच नव्हे तर लहान-मोठ्या गावांचा इतिहासही संशोधित करून छोट्यामोठ्या वस्तुसंग्रहालयाच्या रूपाने अथवा स्थानिक इतिहासग्रंथाच्या रूपाने जतन केला जातो कारण तिकडे स्थानिक इतिहास हे राष्ट्रीय इतिहासाचे एक अविभाज्य अंग मानले जाते. मागिल 50-60 वर्षापासून तर स्थानिक इतिहास ही पाश्चात्य देशात रूढ झालेली इतिहासाच्या क्षेत्रातील एक सर्वमान्य संकल्पना आहे. आपल्या भारतामध्येही मागिल 25-30 वर्षापासून स्थानिक इतिहासाकडे आणि इतिहासाच्या पुनर्मांडणीकडे लेखक, संशोधकांचा ओढा वाढल्याचे दिसून येते ही आनंदाची बाब आहे

स्थानिक इतिहासावर संशोधन करून लिखान केल्यानंतर अभ्यासकांना व संशोधकांना आपले संशोधन सादर करण्याची उत्तम संधी परिषदामधून मिळते अखिल महाराष्ट्र पातळीवर महाराष्ट्र इतिहास परिषद, तर खानदेश इतिहास परिषद, मराठवाडा इतिहास परिषद, कोकण इतिहास परिषद, विदर्भ इतिहास परिषद यासारख्या प्रादेशिक परिषदांमधून स्थानिक इतिहासावर मोठ्या प्रमाणात प्रकाश टाकण्यात आला आहे. याशिवाय **UGC** व विद्यापीठाच्या सहकार्यातून घेण्यात आलेल्या परिषदामधूनही स्थानिक इतिहासाची मांडणी करण्याची संधी मिळते.

स्थानिक इतिहास शिकल्याने स्थानिक इतिहासाशी संबंधीत घटना स्थळे, व्यक्ती यांच्याबद्दल एक आत्मियता प्रस्थापित होते. प्रत्येकाला आपल्या गावच्या, परिसराच्या इतिहासाबद्दल एक वेगळेच कुतूहल असते. हे कुतूहल स्थानिक इतिहासाच्या अभ्यासातून कळते स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचाच एक भाग असला तरी त्या बद्दलची ओढ, आत्मियता वेगळीच असते. स्थानिक इतिहासाच्या एखाद्या महत्वाच्या संशोधनामधून राष्ट्राच्या इतिहासावर त्याचा परिणाम दिसून येतो

स्थानिक पातळीवरील अनेक घटक इतिहास संशोधनांची आजही वाट पहात आहे. इतिहासाची व्याप्तीच एवढी वाढली आहे की, आज संशोधकांना त्यामधून नवी संधी निर्माण झालीआहे. राजकीय इतिहासाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक इ. अनेक घटकांचा इतिहासाच्या अभ्यासात समावेश झाला आहे. याशिवाय आलिकडे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाकडे संशोधकांचा

ओढा पहावयास मिळतो. एखादे नविन संशोधन पूर्वीच्या इतिहासाची दिशा बदलू शकते. तर एखाद्या संशोधनातून आपल्या राष्ट्रीय इतिहासात मोत्याची भर टाकल्या जाऊ शकते. उदा. अलिकडेच दहा महिन्यापूर्वी अंबाजोगाई शहराजवळ 11 व्या शतकातील चालुक्यकालीन स्थापत्य कलेचा उत्तम नमुना असलेले बाराखांबी संकलेश्वर मंदिर उत्खन्नात सापडले आहेसध्या पुरातत्व विभागाच्या देखरेखीखाली खोदकाम सुरू आहे या ठिकाणी दोन मंदिराचा पाया आढळल्याने संकलेश्वरासह तीन मंदिराचे संकुल असण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. अनेक मुर्तीही तेथे सापडलेल्या आहेत. थोडक्यात या नव्याने उजेडात आलेल्या स्थानिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहासात भरच पडणार आहे. एक सांस्कृतिक पुरातन वारसा आजपर्यंत काळाच्या पडद्याआड राहिला मात्र या नव्या माहितीने अनेक पैलुवर प्रकाश पडणार आहे. असाच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास स्थानिक पातळीवर शोधुन त्यावर लिखाण करून समाजासमोर मांडल्या जावा. कारण आपला प्राचीन वारसा पुढील पिढ्यांना समजणे आवश्यक आहे त्यांना तो प्रेरणा, स्फूर्ती देणारा आहे.

**निष्कर्ष :**

7. स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा अविभाज्य भाग होय.
8. स्थानिक इतिहासातून पुढील पिढयांना स्फूर्ती, प्रेरणा मिळते.
9. राष्ट्राच्या इतिहासात स्थानिक इतिहासाला महत्वाचे स्थान आहे.

**सारांश :**

इतिहास संशोधन आणि लेखन ही सातत्याने चालू राहणारी प्रक्रिया आहे प्राचीन काळापासून इतिहास लेखनाची ही परंपरा अखंडीतपणे चालू आहे इतिहासाची मांडणी कालपरत्वे, देशपरत्वे आणि उपलब्ध साधनांपरत्वे सतत बदलत जाते. म्हणूनच असे म्हटले जाते को, इतिहास ग्रंथाचे साधारण आयुष्य जास्तीत जास्त 100 वर्षाचे असते. या कालखंडात अनेक नविन दृष्टीकोन विकसीत होतात. नवनवीन पुरावे हाती येतात, त्यातून प्रस्थापित इतिहास ग्रंथ कालबाहय ठरू लागतो

इतिहास लेखनाची ही परंपरा देशपातळीवर, जागतिक पातळीवर सुरू असते तशीच ती स्थानिक पातळीवरही असते. देशाच्या जगाच्या इतिहासाबरोबरच स्थानिक इतिहासही महत्वाचा असतो. बऱ्याच वेळा आपणास देशाचा, जगाचा इतिहास माहित असतो, परंतु आपल्याच गावचा, परिसराचा, तालुक्याचा, जिल्हयाचा इतिहास आपणास माहित नसतो. हा इतिहास माहित करून घेणे आवश्यक ठरते. कारण स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचाच एक भाग असतो. स्थानिक इतिहासामधून आपणास आपल्या गावाची, परिसराची, पूर्वजांची माहिती मिळते पुढील पिढयांसाठी ती प्रेरक मार्गदर्शक ठरते त्यामुळे स्थानिक इतिहासाकडे डोळेझाक होऊ नये.

आपल्या पूर्वजांचा इतिहास आपण शोधावा, तो जतन करून ठेवावा, त्यासाठी ऐतिहासिक साधनांचा शोध घ्यावा व ती जतन करून ठेवावीत, अशी सांस्कृतिक परंपराच आमच्याकडे इंग्रज येईपर्यंत नव्हती मराठ्यांनी इतिहास घडविला पण लिहुन ठेवला नाही, याचे दुष्परिणाम आज आपण पहातो आहोत उदा. शिवजयंतीवरून मतभेद, महापुरूषांचे चारित्र्यहनन, नसलेली पात्र एखाद्याच्या आयुष्यात उभी करणे असे अनेक प्रकार त्यामुळे घडताना दिसून येतात स्थानिक इतिहासाचेही तसेच आहे. आपणास आपलाच इतिहास, संस्कृती, परंपरा याची माहिती नाही. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासामधून ती अडचण दूर होण्याची मदत होईल

**संदर्भ सूची :**

1. पवार जयसिंगराव, आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली (पूर्व), द्वितीयावृत्ती, - 2010.
2. पाटील श्रीराम (संपा), मायबोलीचा मराठवाडा खंड-1, योगेश प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी - 2002.

3. गाठाळ एस.एस., इतिहासलेखनशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्तो, 2015.
4. चिटणीस के.एन., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग-1, संकल्पना व प्रशासन-1998.
5. साळुंके सतीश, बीड जिल्हयाचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास, बीड जिल्हा इतिहास परिषद, बीड, प्रथमावृत्ती, 23 फेब्रुवारी 2011.
6. दै. लोकमत, 28 जानेवारी 2017.
7. दै. सकाळ 29 मार्च 2018.